झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व
पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./तांत्रिक ३/३२२ /२०२३
दिनांक : १० /०२/२०२३

९०४
०९/०३/२०२३

# झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र-प्रारूप योजना

(विशेष नियमावली, २०१४ मधील नियम क्र. एस. आर. ४ (३) अन्वये)

प्रस्तावना :

१. मौजे आकुर्डी स.नं.१७३/३ पै, सि.स.नं. ४६६१/१, येथे अस्तित्वात असलेल्या पांढारकरनगर,झोपडपट्टी संदर्भात २१००.०० चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे श्री. साईगुरू कन्स्ट्रक्शन यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि. १३/१०/२०२१ रोजी प्रस्ताव दाखल केला आहे. सक्षम प्राधिकारी ३, यांचेकडील दि.२०/०८/२०२१ रोजीचे पत्रान्वये सदर प्रकरणात ७२.२७% पेक्षा जास्त झोपडीधारकांची विकसकाला संमती असल्याचे दिसून येते.

२. सदर क्षेत्रावर झोपडपट्टी असल्याचे खालील अहवालांनुसार स्पष्ट होत आहे.

अ) सदरच्या क्षेत्रामध्ये झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती/गलिच्छ वस्ती अस्तित्वात असल्याबाबत संबंधित सक्षम प्राधिकारी तथा सहा-आयुक्त झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभाग पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी यांचा अहवाल जा.क्र.झोनिपू/०४कावि/१५४/२०२१ दि.१७/०८/२०२१ रोजी प्राप्त झालेला आहे.

ब) सदरच्या क्षेत्राची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयातील उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी-३ यांनी समक्ष स्थळपाहणी करुन या क्षेत्रामध्ये झोपडपट्टी सदृश्य परिस्थिती असल्याचा दि.१२/१०/२०२१ रोजी अहवाल सादर केला आहे.

३. उक्त अधिनियमातील कलम ३क च्या तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी सदरचे क्षेत्र हे "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून दि.२४/०५/२०२२ रोजी घोषित करण्यात आले असून सदर आदेशास खालीलप्रमाणे प्रसिद्धी दिली आहे.

अ) महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दि.०२/०७/२०२२ ते दि.०८/०७/२०२२ चे अधिसुचनेद्वारे पृष्ठ क्र. ८ व ९ वर प्रसिद्धी देण्यात आली आहे.

आ) सदर आदेशास दैनिक वृत्तपत्र लोकमत व दैनिक सांजमहानगरी मध्ये दि. ०२/०६/२०२२ रोजी प्रसिद्धी देण्यात आली आहे.

इ) उपरोक्त आदेश सदर झोपडपट्टी क्षेत्रामधील दर्शनीय ठिकाणी डकविण्यात येऊन त्याबाबतचा पंचनामा दि. ०२/०६/२०२२ रोजी करण्यात आला आहे.

४. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे प्रारूप उक्त नियमावलीतील नियम क्र. एस आर ४(३) अन्वये खालीलप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येत आहे.

❖ झोपडपट्टी पुनर्वसन प्रारूप योजना:

<u>झोपडपट्टीचे नाव :</u> पांढारकरनगर,झोपडपट्टी
<u>महानगरपालिका क्षेत्र :</u> पिंपरी चिंचवड महानगरपालिका
<u>योजना क्षेत्र :</u> २१००.०० चौ.मी.

| अ.क्र. | स.नं./सि.स.नं./ फा.प्लॉट नं. | क्षेत्र (हेक्टर – आर) (मालमत्ता पत्रकानुसार) | अधिकार अभिलेखातील भोगवटादाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | स.नं.१७३/३ पै, सि.स.नं. ४६६१/१, | २१००.०० चौ.मी. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |
| | एकूण | २१००.०० चौ.मी. | महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ |

| | | |
|---|---|---|
| १ | योजना क्षेत्र चतु:सीमा :- अ) दि. २४/०५/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम ३ क च्या अधिसुचनेप्रमाणे पुढीलप्रमाणे चतु:सीमा प्रसिद्ध करण्यात आली होती. | पूर्वेस – रस्ता<br>पश्चिमेस – लागू सि.स.नं.४६६१ पै,व स.नं.१७३पै.<br>दक्षिणेस – लागू सि.स.नं.४६६१ पै,व स.नं.१७३पै.<br>उत्तरेस – लागू सि.स.नं.४४८७ |
| | ब) कलम ३ ड नुसार चतु:सीमा खालीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात आला आहे. Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area | झोपडपट्टी निर्मुलन आदेश (पूर्वसूचना) दिनांक १४/१२/२०२२ रोजी पारित करणेत आलेला आहे.<br>पूर्वेस – रस्ता लागू स.नं.१७३पै.सि.स.नं.४६६१ पै,<br>पश्चिमेस – लागू स.नं.१७३पै ,सि.स.नं.४६६१ पै,<br>दक्षिणेस – लागू स.नं.१७३पै.सि.स.नं.४६६१ पै.<br>उत्तरेस – लागू सि.स.नं.४४८७ |
| २ | अ) विकसकाचे नाव. | मे श्री. साईगुरू कन्स्ट्रक्शन |
| | ब) झोपुप्रा., पुणेकडील विकसक नोंदणी क्रमांक. | झोपुप्रा/२७/२०१६ दि.०१/०६/२०१६ वर्ग "अ" |

| | | |
|---|---|---|
| | क) विकसकाच्या गठनासंदर्भातील नोंदणीबाबतचा तपशील. भागीदारी अधिनियमानुसार Registrar of Partnership Firm यांचेकडील नोंदणी तपशील. | भागीदारी संस्था- सह निबंधक,भागीदारी संस्था,पुणे भागीदारी नोदणी क्र PU0000091641 Date 02/06/2021 |
| ३ | वास्तुविशारद नाव व त्यांच्या नोंदणीचा तपशील. | आर्कि. राहुल माळवदकर CA/९३/१५६२९ दि.१५/०२/१९९३ |
| ४ | मिळकतीचे स्वरूप अ) शासकीय/निमशासकीय/खाजगी | सरकारी (महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) |
| | ब) विकसकास प्राप्त झालेल्या अधिकारांचा तपशील. शासकीय-निमशासकीय जमिनीसंदर्भात विशेष नियमावलीच्या नियम क्र. एस. आर. १२ अन्वये जमिनीच्या बाजारमुल्यानुसार २५ टक्के रकमेचा किंवा त्या संदर्भातील भागश: भरणा केल्याचा तपशील<br>Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED ★Pune-Pimpri-Chinchwad Area★ | सदर झोपुयोखालील जमिन ही शासकीय मालकीची असल्याने झोपुप्रा नियमावली-२०१४ नियम क्र.एस.आर.१२ नुसार सदर जमिनीचे क्षेत्रासाठी सन २०२०-२१ चे ASR प्रमाणे येणा-या २५% रक्कम भरून घेणे आवश्यक आहे. सदर योजनेकरिता कार्यालयाकडील परिपत्रक क्रं.३२ दि.२८/१२/२०२० रोजी सार्वजनिक मालकीच्या जमीनीवरील झोपडयांचा पुनर्विकास करताना खाजगी विकासकाकडून अधिमूल्य अकरणीबाबत टप्पे निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार विकसक यांनी पहिला व दुसरा टप्पा मिळून एकूण २० % अधिमुल्य रक्कम विकसक यांनी चलन क्र. २८१ दि.३०/०९/२०२१ रक्कम रु.१७,३७,७३६/- व चलन क्र.०४५६ दि.२०/०९/२०२२ रक्कम रु.१७,३७,७३६/- रोजी इतक्या रक्कमेचा भरणा झोपुप्रा कार्यालयाकडे करण्यात आलेला आहे. |
| | क) सद्यस्थितीत योजना क्षेत्राच्या मालकी हक्कासंदर्भात व इतर बाबतीत न्यायालयीन स्थगिती / वाद विवाद / आक्षेप आहेत किंवा कसे? | योजना क्षेत्राच्या मालकी हक्कासंदर्भात व इतर बाबतीत न्यायालयीन स्थगिती / वाद विवाद / आक्षेप नसल्याबाबतचे विकसक यांनी दिनांक ०२/१०/२०२१ रोजी चे हमीपत्र सादर केलेले आहे. |
| | ड) सक्षम न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्यास तपशील. | योजना क्षेत्राच्या न्यायालयाचे स्थगिती आदेश नसल्याबाबतचे विकसक यांनी दिनांक ०२/१०/२०२१ रोजी चे हमीपत्र सादर केलेले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्राबाबतचा तपशिल. | | | | | |
| | i) | झोपडपट्टीचे क्षेत्रफळ | २१००.०० चौ.मी. | | | |
| | ii) | ३(क) आदेशानुसार SRA क्षेत्र | २१००.०० चौ.मी. | | | |
| | iii) | रस्तारुंदीकरणा खालील क्षेत्र | ०.०० चौ. मी. | | | |
| | iv) | आरक्षणाखालील क्षेत्र | ०.०० चौ. मी. | | | |
| | v). | उर्वरित निव्वळ क्षेत्र | २१००.०० चौ. मी. | | | |
| ६ | i) | झोपुप्रा नियम क्र. एस.आर. १४ (१) (a) नुसार १०% आवश्यक Open Space | सदर योजनेचे क्षेत्र ४०००.०० चौ. मी. पेक्षा कमी असल्यामुळे ओपन स्पेसची आवश्यकता नाही. | | | |
| | ii) | योजने खालील निव्वळ क्षेत्र | २१००.०० चौ. मी. | | | |
| ६ | सक्षम प्राधिकारी, क्र.३ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडील परिशिष्ट - २ नुसार अंतिम पात्रता यादी दि.१४/०९/२०२२ प्रमाणे | | पात्र निवासी | पात्र बिगर निवासी | पात्र संयुक्त (निवासी + बिगर निवासी) | एकूण पात्र |
| | | | १०२ | ०१ | ०० | १०३ |
| ७ | पात्र झोपडीधाकांव्यतिरिक्त अन्य झोपडीधारकांचा तपशील. | | अपात्र निवासी | अपात्र बिगर निवासी | अपात्र संयुक्त (निवासी + बिगर निवासी) | एकूण अपात्र |
| | (अ) अपात्र | | १४ | ०० | ०० | १४ |
| | (ब) सार्वजनिक शोचालाय | | -- | -- | -- | ०१ |
| | (क) बंद झोपड्या | | ०२ | ०० | ०० | ०२ |
| | (ड) एकूण (अ + ब + क) | | ११८ | ०१ | ०० | १२० |
| ८ | एकूण प्रस्तावित झोपडीधारक | | ११८ निवासी झोपडीधारक + ०१ बिगरनिवासी झोपडीधारक = एकूण ११९ झोपडीधारक | | | |
| ९ | (अ) टेनामेंट डेन्सीटी (नियम क्र. एस.आर. १३(२) नुसार) अस्तित्वात असलेल्या एकूण (पात्र व अपात्र) झोपडयांची संख्या विचारात घेऊन येणारी टेनामेंट डेन्सिटी (११९ x १०,००० / २१००.००) = ५६६ | | अस्तित्वातील टेनामेंट डेन्सिटी ५६६ > ४५० त्यामुळे प्रस्तुत योजनेसाठी एकूण ४.०० इतका च.क्षे.नि. लागू राहील. | | | |
| | (ब) अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक | | ४.०० | | | |
| | (क) एकुण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र (२१००.०० X ४.०० | | ८४००.०० चौ.मी. | | | |

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

| | | |
|---|---|---|
| १०. | विकास आराखड्यानुसार भूखंडावरील आरक्षण व अन्य तरतूदी. | उप संचालक, नगररचना व विकास विभाग, पिंपरी-चिंचवड यांचेकडील - जा.क्र. नरवि/ कावि/ आकुर्डी/ ३७/१३/२०२१ दि.०२/०९/२०२१ रोजी प्राप्त झाला असून सदर अभिप्रायात विषयांकित मिळकत ही औधोगिक झोन मध्ये येत असल्याचे,नमूद केले आहे. |
| ११. | भूखंडावर विकसकाने प्रस्तावित केलेले पुनर्वसन घटकांतर्गत बांधकाम व त्या अनुषंगाने देय होणारे प्रोत्साहनात्मक बांधकाम क्षेत्र - | |
| | अ)पुनर्वसन घटकांतर्गत प्रस्तावित बांधकामाचे चटई क्षेत्रफळ (Proposed Built up Area Under Rehab Tenements) | ३५४०.०७ चौ. मी. |
| | ब) झो.पु.प्रा. नियमावली सन २०१४ मधील नियम क्र. एस.आर. १५ (१) प्रमाणे शासन निर्णय दि.१७/१२/२०१८ अन्वये चटई क्षेत्र निर्देशांक रेशो : | Y = सदनिकेचा दर (सन २०२२-२०२३)<br>= रू. ६८,२००/- प्र चौ.मी.<br>X = बांधकामाचा दर<br>= रू. २६,६२० प्र चौ.मी.<br>n = (Y/X) - २<br>= (६८,२००/ २६,६२०) - २<br>= (२.५६१ - २)<br>= ०.५६१<br>R = [२.८०-(n x ०.३०)]<br>= [२.८०-(०.५६१ x ०.३०)]<br>= [२.८० - ०.१६८]<br>= २.६३१ |
| | क) एकूण पुनर्वसन घटकाचे प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (Total construction Area Under Rehab Component) | ५४४८.०५ चौ. मी. |
| | ड)मुक्त विक्री घटकांतर्गत होणारे प्रोत्साहनात्मक बांधकाम क्षेत्र (Incentive construction Area ) (५४४८.०५ x २.६३१) | १४३३३.८२ चौ.मी. |
| | इ) योजनेचे एकूण अनुज्ञेय प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (पुनर्वसन घटक + मुक्त विक्री घटक) (Scheme FSI) (५४४८.०५ + १४३३३.८२) | १९७८१.८७ चौ.मी. |
| | ई)योजना क्षेत्रावर अनुज्ञेय असणारे चटई क्षेत्र (२१००.०० X ४.००) | ८४००.०० चौ.मी. |

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | योजने अंतर्गत बांधकाम होणाऱ्या इमारती तसेच सदनिका संख्या – ११८ सदनिका + ०१ दुकान गाळे = एकूण ११९ | | | |
| | प्रयोजन | पुनर्वसन घटक | | |
| | | इमारती संख्या | सदनिका संख्या | मजले |
| | अ) निवासी | १ | ११९ | ९ |
| | ब) बिगरनिवासी | -- | ०१ | -- |
| | क) एकूण | १ | १२० | ९ |
| | ड) एफ. एस. आय | ३५४०.०७ चौ.मी. | | |
| | इ) भूखंडावरील प्रस्तावित ठिकाण | संपूर्ण भूखंडावर पुनर्वसन घटक प्रस्तावित आहे. | | |

<u>सदरच्या प्रारूप योजनेबाबतचा अन्य तपशील खालीलप्रमाणे आहे–</u>

१. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत दि.०१/०१/२००० या अर्हता दिनांका रोजी अथवा त्यापूर्वी अस्तित्त्वात असलेल्या शासकीय-निमशासकीय व खाजगी जमिनीवरील घोषित तसेच, गणनाकृत झोपडपट्टीत सध्या प्रत्यक्ष राहत व वास्तव्य करीत असलेल्या झोपडीधारकांचा निवारा संरक्षित करण्यात आला आहे. सदर योजनेअंतर्गत पात्र ठरणा-या झोपडीधारकांना ३०० चौ.फुट. चटई क्षेत्राची सदनिका विनामुल्य देण्यात येणार असून दि.०१/०१/२०११ या अर्हता दिनांकानुसार सन २००० ते २०११ दरम्यानचे अपात्र व्यक्तिंचे सशुल्क पुनर्वसन उपलब्धतेप्रमाणे करण्यात येणार आहे.

२. सदर मिळकतीवरील झोपडीधारकांनी एकत्रित येऊन सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापित करणे अनिवार्य आहे. त्याबाबतचा रितसर अर्ज व आवश्यक ती सर्व कागदपत्रे प्राधिकरणातील सहकार विभागाकडे तात्काळ दाखल करणे आवश्यक राहील.

योजनेतील जमीन शासकीय असल्याने सदर जमीन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये निहित होणे आणि सदर जमीनीसंदर्भातील झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेसोबत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन व पुर्नविकास) अधिनियम, १९७१ च्या कलम १५(अ) प्रमाणे ३० वर्षांचा दीर्घ मुदतीचा भाडेपट्टा करारनामा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे वतीने करणे अभिप्रेत आहे. तसेच सदर मिळकत ही शासकीय भोगवट्यातील असल्याने विशेष नियमावली २०१४ मधील नियम क्र. एस. आर. १२ नुसार सदर जमीनीच्या क्षेत्रासाठी बाजारमूल्यानुसार देय होणा-या २५ ट्क्के रकमेपैकी उर्वरीत रक्कम विकसक यांनी ईमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र घेण्यापूर्वी या प्राधिकरणाकडे भरणा करणे आवश्यक राहील.

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

३. सदरील क्षेत्र हे उक्त अधिनियमाचे कलम ३(क) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून दि.२४/०५/२०२२ रोजी अंतिमत: घोषित करण्यात आले असून उक्त अधिनियमाचे कलम ३(ड) सह कलम १२ अंतर्गत सदरील क्षेत्राबाबत झोपडपट्टी निर्मुलन आदेश (पूर्वसूचना) दिनांक १४/१२/२०२२ रोजी पारित करणेत आलेला आहे.परतू अद्याप अंतिम झोपडपट्टी निर्मूलन आदेश पारित करण्यात आलेला नाही.

४. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेच्या दृष्टीने व सदर मिळकतीवरील पात्र झोपडीधारकांचे कायमस्वरूपी पुनर्वसन करणेच्या उद्देशाने सदर मिळकतीबाबत झोपडपट्टी निमूर्लन आदेश निर्गमित करण्यापूर्वी सर्व पात्र लाभार्थ्यांची विकसकामार्फत संक्रमण शिबिरामध्ये अथवा घरभाडे देऊन तात्पुरती पर्यायी निवास व्यवस्था करण्यात येईल, त्या अनुषंगाने, सर्व पात्र लाभार्थ्यांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये सहभाग घेणे अनिवार्य आहे व प्रक्रियेस सहकार्य करणे बंधनकारक राहील.

५. कोणत्याही झोपडीधारकाने झोपडपट्टी निर्मूलन आदेशान्वये विहीत मुदतीत त्याची झोपडी / दुकान रिकामे न केल्यास अथवा झोपडीधारकाची योजनेस संमती नसल्यास / झोपडीधारकास योजना मान्य नसल्यास असा पात्र झोपडीधारक उक्त अधिनियमाच्या कलम ३(झ) अन्वये त्याचा पुनर्वसनासाठीचा हक्क गमावून बसेल व त्याचे पुनर्वसन न करता तो निष्कासनासंदर्भातील कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील. त्याचबरोबर, अपात्र झोपडीधारकांना आवश्यक तेथे बळाचा वापर करून सदर योजना क्षेत्रामधून निष्कासित करण्यात येईल.

६. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे बांधकाम विकसकामार्फत पूर्ण करण्यात आल्यानंतर सदर योजनेमधील सर्व पात्र लाभार्थ्यांना प्राधिकरण कार्यालयामार्फत सोडत पद्धतीने सदनिकांचे वाटप करण्यात येईल. त्यानंतर विकसकामार्फत अशा सदनिकेचा वैयक्तिक करारनामा संबंधित लाभार्थीच्या (पती-पत्नी यांच्या संयुक्त) नावे दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीकृत करून ताब्यात देण्यात येतील. जर संबंधीत झोपडीधारकाने त्यांना निश्चित करण्यात आलेल्या सदनिकेचा करारनामा करून सदनिकेचा ताबा घेण्यास कसूर केल्यास असे लाभार्थी उक्त अधिनियमाच्या कलम ३(झ) अन्वये आपला पुनर्वसनाचे हक्क गमावतील.

७. झोपडपट्टी पुनर्वसन इमारतीच्या देखभालीबाबत :

अ) सदर योजनेबाबत होणाऱ्या सामायीक सुविधा सुस्थितीत ठेवण्याची तसेच अशा सुविधापोटींच्या मासिक देखभाल शुल्क खर्च, मासिक वीजबिल, पाणीपट्टी, सरकारी कर, पट्टे इत्यादी भरण्याची जबाबदारी सदर योजनेसंदर्भात स्थापित झालेल्या/होणाऱ्या सहकारी गृहनिर्माण संस्थेची असेल.



Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

ब) पात्र लाभार्थींना हस्तांतरीत करण्यात येणा-या वैयक्तिक सदनिकेच्या आतील भागासंदर्भातील सर्व कर/शुल्क, विजबिल, पाणीपट्टी इत्यादी देण्याची जबाबदारी ही संबंधित लाभार्थ्यावर राहील.

क) पुनर्वसन क्षेत्राकरीता उद्वाहन, पाणीपुरवठा व्यवस्था, सांडपाणी व्यवस्था, फ़ायर हायड्रंट् व घन कचरा व्यवस्था याबाबत झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावे जमिनीचे व इमारतीचे अभिहस्तांतरण झालेनंतर विकसकाच्या खर्चाने ५ वर्षाकरीता वार्षिक देखभाल करार करणे बंधनकारक राहील. मात्र, त्या संदर्भातील वित्तीय तरतूद वगळता उर्वरीत जबाबदारी ही सहकारी गृहनिर्माण संस्थेची राहील.

८. सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील सर्व झोपडीधारकांना याद्वारे कळविण्यात येते की, सदर योजनेसंदर्भात तसेच सोबत प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थळदर्शक नकाशा संदर्भात (Site Plan) तसेच प्रारूप योजने संदर्भात आपल्या कोणत्याही सूचना/आक्षेप/हरकती असल्यास, त्याबाबत सदरील प्रारूप योजना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे - १६ या कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात आवश्यक ती कागदपत्रे आणि पुराव्यांसह सादर कराव्यात. सबळ पुराव्याशिवाय दाखल केलेले तसेच विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही आक्षेप/हरकती/सूचना/दावे या कार्यालयाकडे स्विकारले अथवा विचारात घेतले जाणार नाहीत याची जाणीव याद्वारे करून देण्यात येत आहे.

संबंधितांचे म्हणणे व प्रकरणात दाखल असलेली कागदपत्रे आणि पुरावे विचारात घेऊन सन २०१४ च्या विशेष झोपडपट्टी पुनर्वसन विकास नियमावलीतील नियम क्र. एस आर ४(५) अन्वये सदरच्या प्रारूप योजनेस अंतिम मान्यता देण्यात येईल व याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

९. या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) आणि भूखंड आरेखन / इमारत नकाशा यांस मंजूरी देणेसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे पारित करण्यात येतील. सदरच्या प्रारूप योजनेमध्ये प्रसंगानुरूप आवश्यक असल्यास बदल करण्यात येतील.

१०. सदर प्रकरणी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० च्या विनियम १४.६ नुसार पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू असलेली विशेष नियमावली २०१४ ही पुनर्वसन घटकासाठी तर मुक्त विक्री घटकासाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील तरतूदी लागू होतील.

Slum Rehabilitation Authority ★ Technical Department ★ APPROVED ★ Pune-Pimpri-Chinchwad Area

११.सदर योजनेचे विकसक मे श्री. साईगुरू कन्स्ट्रक्शन यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील व या संदर्भातील शासनाने व प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील.

सदरची प्रारूप योजना ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह जारी करण्यात आली आहे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- / /२०२२

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

10-2-2023

नीलेश र. गटणे भा.प्र.से
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे.
२. झोपुप्रा पुणे कार्यालयातील विभाग
   - सक्षम प्राधिकारी क्र.३
   -सहा.निबंधक सहकारी संस्था - सदर प्रकरणी सहकारी संस्था नोंदणी प्रक्रिया चालू करावी.
   -संगणक शाखा - सदर आदेशास संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.
३. जमिनीचे भोगवटादार - १) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे.
४. विकसक- मे श्री. साईगुरू कन्स्ट्रक्शन हिंद सर्व्हिसेस, धनकवडी, बह २५/१ पुणे ४३.
५. मौजे आकुर्डी स.नं.१७३/३ पै, सि.स.नं. ४६६१/१, (पांढारकरनगर, झोपडपट्टी) येथील झोपडपट्टीधारकांकरीता माहितीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.